डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील पदांना वेतन त्रुटी निवरण समिती-२०२४ च्या अहवालावधील वेतनश्रेण्यांविषयक व आनुषंगिक शिफारसी लागू करण्याबाबत.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

वाचाः १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. कृषिवि-३७१९/प्र.क्र.४०/६-अे, दिनांक १६.०२.२०२१.
२. विद्यापीठ प्रशासकीय आदेश क्र. बीईजी/७-वे वेतन/शिक्षकेत्तर/०१/२४६३/२०२१, दिनांक १८.०२.२०२१
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दिनांक ०२.०६.२०२५
४. कार्यसन अधिकारी, महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग यांनी त्यांचे पत्र क्र. संकीर्ण-१५२५/प्र.क्र.१४०/६-अे, दिनांक २३.०६.२०२५

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दि. ०२ जुन, २०२५ नुसार या विद्यापीठांतर्गत असलेल्या पदांना सुधारीत वेतन संरचना लागु करण्याकरीता कार्यसन अधिकारी, महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग यांनी त्यांचे पत्र क्र. संकीर्ण-१५२५/प्र.क्र.१४०/६-अे, दि. २३.०६.२०२५ नुसार कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त बाबत सादर करण्यात येते की, या विद्यापीठातील विविध संवर्गातील पदांच्या वेतनश्रेणी मधील त्रुटी दुर करण्याचे अनुषंगाने विद्यापीठाव्दारे कृषि परिषद, पुणे यांच्या मार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांचे अनुषंगाने वेतनत्रुटी निवारण समिती-२०२४ यांचे अहवालानुसार महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दि. ०२ जुन, २०२५ सुधारीत वेतनश्रेणी मंजुर केली आहे.

## प्रशासकीय आदेश

**जा.क्र. बीईए/७-वे वेतन/शिक्षकेत्तर/त्रुटी/०१/२०२५/1238** **दि. १६ जुलै, २०२५**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दि. ०२ जुन, २०२५ नुसार वेतन त्रुटी समितीचे शिफारसीनुसार सुधारीत वेतनश्रेणी मंजुर केली आहे. त्यानुसार विद्यापीठांतर्गत खालील नमुद संवर्गाच्या वेतनश्रेण्यांविषयक व आनुषंगिक शिफारसी स्वीकृत करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद या विद्यापीठातील खालील पदांना वेतन त्रुटी समितीने शिफारस केलेली ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवगाचे नांव | समितीने शिफारस केलेली ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी रुपये | समितीने शिफारस केलेली ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी रुपये |
|---|---|---|---|
| | **डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला** | | |
| १ | शाखा अभियंता | एस-१५:४१८००-१३२३०० | **एस-१६:४४९००-१४२४००** |
| २ | कनिष्ठ अभियंता | एस-१३:३५४००-११२४०० (एस-१०:२९२००-९२३०० या विद्यापीठामधील पदाची वेतनश्रेणी) | **एस-१५:४१८००-१३२३००** |
| ३ | कार्यदेशक पर्यवेक्षक | एस-१०:२९२००-९२३०० | **एस-१३:३५४००-११२४००** |

..२

जा.क्र. बीईए/७-वे वेतन/शिक्षकेत्तर/त्रुटी/०१/२०२५ दि. १६ जुलै, २०२५

| डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत ग्रामीण शिक्षण संस्था, पिंपरी वर्धा | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | संवगाचे नांव | समितीने शिफारस केलेली ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी रुपये | समितीने शिफारस केलेली ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी रुपये |
| ४ | फिल्डमन फॉर हॉर्टिकल्चर | एस-७:२१७००-६९१०० (एस-६: १९९००-६३२०० या विद्यापीठामधील पदाची वेतनश्रेणी) | एस-८:२५५००-८११०० |
| ५ | फिल्डमन | एस-६: १९९००-६३२०० (एस-७:२१७००-६९१०० या विद्यापीठामधील पदाची वेतनश्रेणी) | एस-८:२५५००-८११०० |

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दि. ०२ जुन, २०२५ नुसार वरिल पदांकरीता नमुद केलेले सुधारीत वेतनस्तर दि. ०१.०१.२०१६ पासुन काल्पनिक रित्या मंजुर करण्यात यावेत आणि प्रत्यक्ष आर्थिक लाभ दि. ०१.०६.२०२५ पासुन देण्यात यावा, मात्र दि. ०१.०१.२०१६ ते ३१.०५.२०२५ पर्यंत कुठल्याही संवर्गाला वरिल शिफारसींमुळे थकबाकी अनुज्ञेय ठरणार नाही. तसेच वरिल संवर्गातील जे कर्मचारी दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ मे, २०२५ या कालावधीत सेवानिवृत्त झाले असतील, त्या कर्मचा-यांची दि. ०१.०१.२०१६ पासुन सुधारीत वेतनसंरचनेत काल्पनिक वेतन निश्चिती करण्यात यावी. दिनांक ०१.०१.२०१६ ते संबंधीत कर्मचा-याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत अनुज्ञेय वेतन वाढी विचारात घेऊन निवृत्ती वेतन सुधारीत करण्यात यावे. सुधारीत निवृत्ती वेतनाचे प्रत्यक्ष लाभ दि. ०१.०६.२०२५ पासुन देण्यात यावेत, त्यापुर्वीची थकबाकी अनुज्ञेय करण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रशासकीय आदेश विद्यापीठाचे वित्त विभागाचे सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहेत.
मा. कुलगुरूंचे मंजुरीने व आदेशानुसार.

स्वाक्षरित/-
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलीपी:-

१. अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
२. विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी/कृषि शक्ती व औजारे विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
३. नियंत्रक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
४. विद्यापीठ अभियंता, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
५. प्राचार्य, ग्रामीन शिक्षण संस्था, पिंपरी जि वर्धा.
६. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/नागपुर
७. मा. कुलगुरू/कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू/कुलसचिव यांचे माहितीकरीता.
८. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक कक्ष, अकोला यांना विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
९. ..............................................................

उपकुलसचिव (आस्था.),
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला